नियमित दिवाणी दावा क्र.१२५५/२०१३
पांडुरंग वि. उत्रेश्वर व इ.

MHSO130021752013

## निशाणी क्र. ४५ वरील आदेश

वादी ने सदरचा अर्ज मयत प्रतिवादी क्र.१ चे वारस रेकॉर्डवर घेऊन दुरुस्ती करणेकामी परवानगी मिळणेकरीता दिला आहे. दाव्याचे कामकाज चालू असताना प्रतिवादी नं.१ उत्रेश्वर बाबु सावंत हे दिनांक २८/१२/२०२० रोजी उस्मानाबाद येथे मयत झाले आहेत. त्यामुळे मयत प्रतिवादीचे वारस रेकॉर्डवर घेवून दाव्याचे काम पुढे चालणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक आहे. त्याचबरोबर प्रतिवादी क्र.१ चे वारस त्यांची पत्नी प्रतिवादी क्र.८ या अगोदरच दाव्यात सामील आहेत. तसेच उर्वरीत वारस रेकॉर्डवर घेणे आवश्यक आहे. म्हणुन अर्ज मंजुर होण्याची विनंती केली. सदर अर्जास प्रतिवादींनी म्हणणे देऊन अर्जास विलंब झाल्याने नामंजूर करण्याची विनंती केली.

२. अभिलेखावरील उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन केले. दोन्ही बाजुस ऐकले. वादीने सदरचा दावा हा साठेखतावरुन खरेदीखत होऊन मिळणेसाठी दाखल केला आहे. सदर प्रतिवादी नं.१ यांचा मृत्यु झाला असल्याबाबत प्रतिवादींनी त्यांचा मृत्युचा दाखला निशाणी क्र.४० च्या पुरसीससोबत जोडलेला आहे. त्यांची पाहणी केली असता त्यावर प्रतिवादी क्र.१ हे दिनांक २९/१२/२०२० रोजी मयत झाल्या असल्याचे दिसून येते. त्याचबरोबर प्रतिवादी क्र.१ चे वारसांपैकी त्यांची पत्नी प्रतिवादी क्र.८ या अगोदरच दाव्यात सामील आहेत. तसेच उर्वरीत वारस रेकॉर्डवर घेणे देखील आवश्यक आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र.१ च्या वारसांना दावा चालविण्याचा अधिकार जिवंत राहतो. त्यामुळे वादीचा सदरचा निशाणी क्र. ४५ चा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. सबब, वादीचा अर्ज निशाणी क्र.४५ मंजूर करण्यात येतो, वादीला असे सुचित करण्यात येते की त्यांनी आवश्यक ती दुरुस्ती करुन दुरुस्त दाव्याची प्रत दाव्याचे कामी दाखल करावी. दावा दुरुस्ती झाल्यानंतर प्रतिवादी क्र.१ चे वारसांना मुद्दे निश्चितीसाठी व कैफीयत देणेसाठी दाव्याचे समन्स काढावे.

Sd/-
(एस.बी. विजयकर)
सह. दिवाणी न्यायाधीश क. स्तर, बार्शी.

बार्शी
दिनांक २४/०१/२०२४.

# C E R T I F I C A T E

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment / Order

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of the Stenographer | : | S.R. Barangule |
| (b) | Court | : | S.B. Vijaykar, Jt.C.J.J.D.&J.M.F.C. Barshi. |
| (c) | Judgment /Order declared on | : | 24/01/2024 |
| (d) | Judgment /Order signed by P.O. on | : | 24/01/2024 |
| (e) | Judgment /Order uploaded on | : | 24/01/2024 |